# मिरा-भाईंदर,वसई- विरार आयुक्तालय

विषय :- दिनांक- **२५/११/२०२२** रोजीचे पेपर कात्रणाबाबत.

१) गुन्हेगारी घटना २) कायदा व सुव्यवस्था ३) राजकीय घटना ४) इतर

| अ. क्र. | दिनांक | वर्तमान पत्राचे नांव | बातमीचा मथळा (Heading) | संबंधीत पो.ठाणे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | २५.११.२०२२ | पुण्यनगरी पु. पा .०१ | धारावी किल्यावरील मद्यपानाबाबत महापालिकेला मानवाधिकार आयोगाची नोटीस | उत्तन | |
| २. | २५.११.२०२२ | पुण्यनगरी पु. पा .०१ | पत्ते खेळण्यावरुन कामगारांच्या दोन गटात हाणामारी | काशिमीरा | |
| ३. | २५.११.२०२२ | पुण्यनगरी पु. पा .०१ | सहा वर्षापासून फरार असलेल्या खुनातील आरोपीस उत्तरप्रदेशातून अटक | नवघर | |
| ४. | २५.११.२०२२ | पुण्यनगरी पा.नं. ०२ | श्रध्दा वालकर हत्याकांडातप्रकरणी पोलिसांची भाईंदर खाडीत शोधमोहीम | इतर | |
| ५. | २५.११.२०२२ | पुढारी पा. नं.०३ | महामार्गावर ५ वाहने एकमेकांना धडकली | मि.भा.व.वि. | |
| ६. | २५.११.२०२२ | पुढारी पु. पा. ०३ | छत्रपती शिवरायांचा अपमान करणा-या राज्यपालासह भाजपा प्रवक्ता हटाव, कॉंग्रेसचे आंदोलन तीव्र | इतर | |
| ७. | २५.११.२०२२ | पुढारी पु. पा. ०३ | लॉजिंग बोर्डीगवर गुन्हे शाखेची कारवाई | युनिट ०१ | |
| ८. | २५.११.२०२२ | पुढारी पा. नं. ०२ | राज्यपाल, बोम्मईवरुन विरोधकांचा हल्लाबोल | इतर | |
| ९. | २५.११.२०२२ | सकाळ पु. पा. ०३ | वसई-विरारमध्ये गटारांचा धोका | वसई-विरार | |
| १०. | २५.११.२०२२ | सामना पा. नं .०२ | गुप्तधनाच्या नावाखाली एकाला गंडवले | इतर | |
| ११. | २५.११.२०२२ | सकाळ पु. पा .०२ | नार्को टेस्ट ठरु शकते अंधारातील मशाल | इतर | |
| १२. | २५.११.२०२२ | म.टा. पु. पा. ०१ | हिंदी भाषा भवनाचे रविवारी भूमिपूजन | मिरा-भाईंदर | |
| १३. | २५.११.२०२२ | म.टा. पा.नं.१व ७ | "महाराष्ट्रप्रेमींनो, कोश्यारींविरुध्द एकत्र या | इतर | |

पुण्यनगरी ५·११·९

# धारावी किल्ल्यावरील मद्यपानाबाबत महापालिकेला मानवाधिकार आयोगाची नोटीस



**मीरा रोड :** भाईंदर पश्चिमेच्या उत्तन चौक येथील जंजिरे धारावी किल्ला येथे दारूच्या बाटल्या पडलेल्या दिसून येत आहेत. किल्ला हा मद्यपींचा अड्डा बनला आहे. समाजमाध्यमावर व्हिडीओ आल्यानंतर याची राज्य मानवाधिकार आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. आयोगाने मीरा-भाईंदर महापालिकेला नोटीस पाठवली असून यासंदर्भात ३० नोव्हेंबरला सुनावणी घेण्यात येणार आहे. या सुनावणीला महापालिका प्रशासनाला उपस्थित राहण्यास सांगण्यात आले आहे.

मीरा-भाईंदर शहराला ऐतिहासिक वारसा लाभलेल्या जंजिरे धारावी किल्ल्याचे संवर्धन करण्यासाठी महापालिकेने सुशोभीकरणाचा आराखडा तयार केला आहे. यासाठी शासनाकडून निधी देण्यात येंणार आहे. हा निधी शासनाच्या लालफितीत अडकला आहे. या किल्ल्याचे संवर्धन होत नसल्यामुळे हा किल्ला मद्यपींचा अड्डा बनला असल्याचे नुकतेच उघडकीस आले आहे. जंजिरे धारावी किल्ला खाडीला लागून असल्यामुळे रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन मद्यपी याठिकाणी दारू पित असल्याचे दिसून येते. किल्ल्याची साफ सफाई करत असताना याठिकाणी मोठ्या प्रमाणात दारूच्या खाली बाटल्या आढळून आल्या. त्याची छायाचित्रे समाजमाध्यमांवर व्हायरल झाल्यानंतर त्याची दखल राज्य मानवाधिकार आयोगाने स्वतः घेतली आहे. किल्ल्याची दुरवस्था होत असल्याचे पाहून आयोगाने मीरा-भाईंदर महापालिकेला नोटीस पाठवली आहे.

येत्या ३० नोव्हेंबरला यासंदर्भात सुनावणी घेण्यात येणार आहे. या सुनावणीला महापालिका प्रशासनाला उपस्थित राहण्यास सांगण्यात आले आहे. मीरा-भाईंदर महापालिकेने किल्ल्याच्या वरील भागात नरवीर चिमाजी अप्पा स्मारक बांधले आहे. त्याठिकाणी सुरक्षेच्या दृष्टिकोनातून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत. परंतु किल्ल्याचा समुद्रालगतचा भाग अद्याप महापालिकेला हस्तांतरित झालेला नाही. वास्तविक हा किल्ला पुरातत्त्व खात्याकडे आहे. त्यामुळे किल्ल्यात सुरक्षा रक्षक तैनात केलेले नाहीत. याचा फायदा मद्यपी घेत आहेत. या प्रकरणाशी महापालिकेचा संबंध येत नसल्याची माहिती सुनावणीवेळी आयोगाच्या निदर्शनास आणून दिली जाणार आहे, असे पालिकेचे उपायुक्त संजय शिंदे यांनी सांगितले आहे.

# पत्ते खेळण्यावरून कामगारांच्या दोन गटांत हाणामारी

**मीरा रोड :** मीरा-भाईंदरमधील मेट्रोचे ठेकेदार जे.कुमार यांच्या कामगारांच्या दोन गटांमध्ये मंगळवारी रात्री काशिमीरा येथे पत्ते खेळण्यावरून वाद झाला व त्यानंतर तुफान हाणामारी झाली. या हाणामारीमध्ये तीन कामगार जखमी झाले आहेत. या हाणामारीमुळे परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणी काशिमीरा पोलिसांनी गुन्हा दाखल करून ५ जणांना अटक केली.

मीरा-भाईंदर शहरात मेट्रोचे काम सुरू झाल्यापासून वाहतूक कोंडी व कर्मचाऱ्यांकडून मारहाणीचे प्रकार घडत आहेत. जे. कुमार ठेकेदाराला महापालिकेने काशिमीरा प्लेझंट पार्क येथे आरएमसी प्लांट व साहित्य ठेवण्यासाठी आरक्षण असलेली जागा उपलब्ध करून दिली आहे. या जागेमध्ये आरएमसी प्लांट उभारण्यात आला असून, तेथेच इतर साहित्य व कामगारांना राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. या कामगारांकडून यापूर्वी देखील अनेक वेळा मारामाऱ्या झाल्याचे प्रकार घडले आहेत. जे कुमार ठेकेदाराकडे मोठ्या प्रमाणात परप्रांतीय कामगार हे कामाला आहेत. यांची पोलिसांकडे कोणत्याही प्रकारची नोंद नसल्याचे सांगितले जाते. त्यामुळे शहरात अशा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांमुळे गुन्हेगारी वाढत असून, ही पोलिसांची डोकेदुखी ठरत आहे. त्यामुळे अशा कामगारांवर कठोर कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे. सोमवारी दुपारी दरोगा व टप-टीममधील कामगार यांच्यामध्ये पत्ते खेळण्यावरून वाद झाला होता व टप टीममधील कामगार यांच्या काही लोकांनी कामगारांच्या रूममध्ये येऊन गुलजार अली याला मारहाण केली होती. त्यानंतर एकमेकांना समजावून हा वाद मिटवण्यात आला होता. त्यानंतर मंगळवारी रात्री साडे नऊच्या सुमारास लेबर कॉलनीच्या बाहेर दरोगा, गुलजार, अशफाक, सोनू यांना टप टीमचे सुपरवाझर आलम, राजा, मुझफर, सदाम, समीर, निजामुद्दीन व इतर असे ८ ते १० जण लोखंडी रॉड, सळई, लाकडी दांडक्यानी व लाथाबुक्क्यांनी मारहाण करत होते. त्यावेळी सुपरवायझर अभिषेक तिवारी हा भांडण सोडवण्यासाठी गेला असता त्यालाही मारहाण करण्यात आली. यामध्ये तिवारी हा बेशुद्ध पडला होता, तर तिवारी, दरोगा राजमणी, नफीस अली यांना इंदिरा गांधी रुग्णालयात दाखल केले होते. तर कामगार गंभीर जखमी असल्याने त्यांना शताब्दी रुग्णालयात दाखल केले आहे. या प्रकरणी ५ जणांवर काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील पाच आरोपींना अटक करण्यात आले असून न्यायालयात हजर केले असता पाच दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

पुण्यनगरी पृ.पा-९

# सहा वर्षांपासून फरार असलेल्या खुनातील आरोपीस उत्तर प्रदेशातून अटक

**।मीरा रोड :** नयानगर पोलीस ठाणे हद्दीत सहा वर्षांपूर्वी रईस रोशन अन्वर हुसेन याचा खून झाला होता. त्याच्या खुनातील मुख्य आरोपी हा गेल्या सात वर्षांपासून फरार होता. त्या फरार आरोपीस गुन्हे शाखा, कक्ष-१ काशिमीरा यांनी उत्तर प्रदेश येथून अटक केली आहे.

मीरा-भाईंदर महापालिकेचे मलनिस्सारण प्लांटजवळ पप्याडे हॉटेल ते लोढा रोड, नयानगर येथे रईस रोशन अन्वर हुसेन याचा खून केला होता. यातील आरोपी शानू कालिया ऊर्फ शाहनवाज आयज अहमद खान यांच्यात पूर्वीच्या झालेल्या भांडणाचा वाद होता. या गोष्टीचा मनात राग धरून कायमचा धडा शिकवण्यासाठी शानू कालिया व त्याचे साथीदार सोहेल शेख, नौशाद ऊर्फ अली इर्शाद शेख, असद अहमद सिद्धीकी यांनी त्याचा काटा काढला. याबाबत नयानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. यातील सोहेल शेख, नौशाद ऊर्फ अली इर्शाद शेख यांना अटक करण्यात आलेली आहे. हा गुन्हा करणारा मुख्य आरोपी शानू कालिया ऊर्फ शाहनवाज आयज अहमद खान हा गुन्हा केल्यापासून फरार झाला होता. या आरोपीचा वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, कक्ष-१ काशिमीरा यांच्याकडून तपास सुरू होता. पोलीस तपास पथकाला मुख्य आरोपी शानू कालिया ऊर्फ शाहनवाज हा बहबल का पूर्वा, माहोना येथे असल्याची माहिती मिळाल्याने तेथे जाऊन तपास चालू केला. तपास एसटीएफ लखनौ, उत्तर प्रदेश यांच्या मदतीने त्या परिसरात सापळा रचून आरोपीस अटक करण्यात आली. ही कामगिरी पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे, सहाय्यक आयुक्त अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष १ काशिमीरा यांनी केली आहे.

पुण्यनगरी पा.नं.२०

# श्रद्धा वालकर हत्याकांडप्रकरणी पोलिसांची भाईंदर खाडीत शोधमोहीम

**।मीरा रोड :** वसईतील श्रद्धा वालकरची आफताबने दिल्लीत




हत्या करून तिच्या शरीराचे ३५ तुकडे केल्याचे प्रकरण सध्या देशभर गाजत आहे. याप्रकरणी आता नवीन खुलासे समोर येत आहेत. दिल्ली पोलीस हे या हत्याकांडाचा तपास करत आहेत. या तपासादरम्यान आफताबने रेल्वे प्रवासादरम्यान भाईंदर खाडीत मोबाईल फेकल्याचे सांगितल्याने पोलीस यंत्रणा कामाला लागली असून गुरुवारी दिल्ली पोलीस व माणिकपूर पोलीस पथकाने भाईंदर खाडीत सर्च ऑपरेशन केले.

वसईतील श्रद्धा वालकर हत्या प्रकरणाचा तपास दिल्ली पोलीस करत आहेत. गेल्या काही दिवसांपासून हे पथक वसई येथे तळ ठोकून आहे. दिल्ली पोलीस हे ठिकठिकाणी जाऊन आफताबची माहिती गोळा करत आहेत. या तपासादरम्यान रोज नवनवीन खुलासे समोर येत आहेत. तपासा दरम्यान पोलिसांना आफताबने रेल्वेने प्रवास करताना भाईंदर खाडीत काहीतरी वस्तू टाकल्याची माहिती मिळाली. ही वस्तू मोबाईल किंवा इतर काही पुरावा असू शकतो. त्यामुळे दिल्ली पोलिसांचे पथक व माणिकपूर पोलीस पथक भाईंदर खाडीत सर्च ऑपरेशन करत आहेत. बोटीतून सर्च ऑपरेशन करताना पोलीस व चांगले पोहणारे काही स्थानिक नागरिक बरोबर आहेत. पोलीस सर्च ऑपरेशनसाठी जाताना पाणी व खाण्याच्या वस्तू बरोबर घेऊन गेले आहेत. त्यामुळे हे सर्च ऑपरेशन उशिरापर्यंत सुरू राहणार आहे. पोलिसांकडून श्रद्धा वालकर हत्याकांडाचे काही पुरावे मिळतात का, याची तपासणी सुरू आहे. वृत लिहीपर्यंत पोलिसांच्या हाती काही लागले नसल्याचे सांगण्यात येते. मात्र रात्री उशिरापर्यंत काही पुरावा हाती लागण्यासाठी पोलीस अधिकारी प्रयत्न करत आहेत. त्यांना स्थानिक नागरिक देखील सहकार्य करत आहेत.

पुढारी पा.नं. ३.

# महामार्गावर ५ वाहने एकमेकांना धडकली

## सुदैवाने कोणी जखमी नाही





**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर महापालिका हद्दीतील पश्चिम महामार्गावर असलेल्या दिल्ली दरबार हॉटेल परिसरातील सिग्नलजवळ वसई येथून मुंबईच्या दिशेने जाणारी वाहने एकमेकांना धडकल्याची घटना गुरुवारी सायंकाळी ५.४५ वाजण्याच्या सुमारास घडली. त्यात मारुती इको (जीजे १५ एव्ही ५८४७), महिंद्रा व्हेरीटो (जीजे ०६ एएक्स १५३४), होंडा असेन्ट (एमएच ४३ बीजी २८९४), महिंद्रा पिकअप (एमएच ०४ एलई ६७९८) व एका ट्रकचा (एमएच ०२ सीपी ९०७८) समावेश आहे. या अपघातात कोणीही जखमी झाल्याचे वृत्त नसले तरी वाहनांचे मात्र नुकसान झाल्याचे अग्निशमन दलाचे मुख्य अधिकारी प्रकाश बोराडे यांनी सांगितले.

गुरुवारी घडलेल्या अपघातावेळी भरधाव वेगात येणाऱ्या ट्रकने सिंगल जवळ थांबलेल्या होंडा असेन्ट कारला मागून धडक दिली. त्यामुळे ही कार पुढील कारवर आदळून पाच वाहने एकमेकांना धडकली. अपघाताची माहिती मिळताच अग्निशमन दलासह काशिमीरा वाहतूक शाखा व पोलीस ठाण्यातील कर्मचाऱ्यांनी तेथे धाव घेतली. त्यांनी क्रेनच्या सहाय्याने अपघातग्रस्त वाहने रस्त्याच्या बाजूला केली. याप्रकारणी काशिमीरा पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

### वाहतूक पोलिसांचे केवळ सर्व्हिस रोडवर लक्ष

या ठिकाणी भरधाव वेगात येणाऱ्या वाहनांमुळे सतत अपघात होत असतात. अपघात रोखण्यासाठी याठिकाणी काशिमीरा वाहतूक शाखेकडून चौकी बांधण्यात आली आहे. मात्र तेथे कर्तव्यावर असलेले कर्मचारी महामार्गावरील वाहतुकीचे नियोजन करण्याऐवजी तेथील सर्व्हिस रोडवरील वाहतुकीवर लक्ष ठेवून असतात आणि सायंकाळ होताच तेथील चौकीला टाळे लागल्याचे दिसून येते

पुढारी ५-पां. ३.

# छत्रपती शिवरायांचा अपमान करणाऱ्या राज्यपालांसह भाजप प्रवक्ता हटाव ; काँग्रेसचे आंदोलन तीव्र

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी एका कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य करून त्यांचा अपमान केला. तर भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ता सुधांशू त्रिवेदी यांनीदेखील एका दूरचित्रवाहिनीवर शिवरायांबद्दल आक्षेपार्ह विधान केले. यामुळे राज्यातील जनतेच्या भावना दुखावल्याने त्याविरोधात मिरा-भाईंदर काँग्रेसने काशिमीरा नाका येथे बुधवारी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर माजी आ. मुझफ्फर हुसेन यांच्या मार्गदर्शनानुसार जिल्हाध्यक्ष प्रमोद सामंत यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन छेडून राज्यपाल व भाजप प्रवक्ता हटावची मागणी केली.



संविधानिक पद भूषवणाऱ्या महाराष्ट्राच्या राज्यपालांनी राज्याची सूत्रे हाती घेतल्यापासून सतत विविध समाजसुधारक, महापुरुषांविषयी वादग्रस्त विधाने केली आहेत. अशा व्यक्तीला केंद्र सरकारने तत्काळ पदमुक्त करून राज्यातील जनतेच्या भावनांचा आदर करावा, अशी मागणी जिल्हाध्यक्ष प्रमोद सामंत यांनी केली. त्याचप्रमाणे भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते सुधांशू त्रिवेदी यांनीदेखील छत्रपती शिवाजी महाराजांविषयी वादग्रस्त वक्तव्य करीत शिवरायांनी औरंगजेबाची पाच वेळा माफी मागितल्याचे एका राष्ट्रीय दूरचित्रवाहिनीवर सांगितले. यावर भाजपप्रणीत केंद्र सरकारने कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त न करता त्यांना पाठीशी घातल्याचा आरोप काँग्रेसने केला. याउलट, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष राहुल गांधी यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर हे माफीवीर होते, हे पत्रकार परिषद घेऊन कागदपत्रांसह दाखवून दिल्यानंतर भाजपसह शिंदे सेना, मनसे यांनी राज्यभर आंदोलन केले.

शिवरायांबद्दल आक्षेपार्ह विधाने करणाऱ्या राज्यपालांसह भाजपच्या राष्ट्रीय प्रवक्त्याविरोधात आंदोलन का करीत नाही, असा प्रश्न उपस्थित करून काँग्रेसने भाजपवाल्यांनी या दोघांच्या वक्तव्याचा निषेध करून कारवाई करण्याची हिंमत दाखवावी, अशी मागणी केली आहे. आंदोलनात माजी उपमहापौर सय्यद नूरजहाँ हुसैन, माजी नगरसेवक अनिल सावंत, फरीद कुरेशी, नगरसेविका रुबिना शेख, प्रदेश प्रतिनिधी प्रकाश नागणे, राकेश राजपरोहित, युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव दीप काकडे, युवक अध्यक्ष सिद्धेश राणे आदींनी सहभाग घेतला होता.

## लॉजिंग बोर्डिंगवर गुन्हे शाखेची कारवाई

**मिरारोड :** काशिमीरा गुन्हे शाखा युनिट १ ने रॉक डेल हॉटेल आणि रिसॉर्टवर छापा टाकून एका सेक्स रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. लॉजिंग बोर्डिंगवर वेश्याव्यवसाय प्रकरणी कारवाई करून मॅनेजर व वेटरला अटक केली आहे. काशिमीरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील घोडबंदर रोड, पाटील पाडा, चेना गावाजवळ, पोलिसांनी रॉक डेल हॉटेल ॲण्ड रिसॉर्ट लॉजिंग बोर्डिंगवर छापा टाकून मॅनेजर आणि वेटरला अटक करून पीडित मुलीची वेश्याव्यवसायाच्या दलदलीतून सुटका केली आहे. मॅनेजर आणि वेटरवर पिटा कायद्यान्वये गुन्हे शाखेने कारवाई केली असून पीडित मुलीला महिला सुधारगृहात पाठवण्यात आले आहे. तसेच या रॉक डेल रिसॉर्टचा चालक आणि मालकाला गुन्हे शाखेच्या पथकाने फरार घोषित केले आहे. पुढील कारवाई काशिमीरा गुन्हे शाखा युनिट १ करत आहे. पालघर जिल्ह्यात सध्या गुन्हेगारीच्या घटना वाढत आहेत. मिरा भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत घरफोड्या, हाणामारी, महामार्गावरील लूट अशा घटना वाढीस लागल्या आहेत. हे वाढते गुन्हे रोखण्यासाठी पोलिस प्रशासनाकडून विविध पथकांची नियुक्ती केलेली आहे. मात्र गुन्ह्यांच्या तपासाचे मोठे आव्हान पोलीस प्रशासनासमोर आहे.

पुढारी पा-नं. २.

# राज्यपाल, बोम्मईवरून विरोधकांचा हल्लाबोल

## उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्याकडून राज्य सरकार आणि भाजपचा खरपूस समाचार

### मिंधे सरकार आल्यापासून महाराष्ट्राची अवहेलना

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

महाराष्ट्रात मिंधे सरकार आल्यापासून सातत्याने राज्याची अवहेलना होत आहे. अचानक सीमाप्रश्नावर कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांच्या अंगात भूत संचारल्याची टीका शिवसेना (ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी गुरुवारी केली. महाराष्ट्र द्रोह्यांना विरोध करण्यासाठी मराठी माणसाची एकजूट व्हायला हवी, असेही ठाकरे म्हणाले.

उद्धव ठाकरे यांनी गुरुवारी पत्रकार परिषद घेत राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, भाजपाचे प्रवक्ते सुधांशु त्रिवेदी यांच्यासह भाजपा आणि शिंदे गटावर जोरदार प्रहार केला. सीमावादाच्या प्रश्नावरून कर्नाटकाच्या बोम्मई सरकारवरही निशाणा साधला. भाजपाच्या अखत्यारितील राज्याचे मुख्यमंत्री त्यांच्या वरिष्ठांच्या मर्जीशिवाय काही बोलू शकतात का, महाराष्ट्राच्या अस्मितेवर हल्ला करण्याचा हा भाजपचा राष्ट्रीय कार्यक्रम आहे का, अशा प्रश्नांची सरबत्ती उद्धव ठाकरे यांनी केली.

राज्यपाल कोश्यारी यांच्या विधानांचा समाचार घेताना ठाकरे म्हणाले की, ही शक्कल एकट्या राज्यपालांच्या काळ्या टोपीतून आलेली नाही. या मागील मेंदू कोण आहे, हे शोधण्याची वेळ आली आहे. महाराष्ट्रातील आदर्शांचा हलकटपणे अपमान केला जात आहे. मागे भगतसिंह कोश्यारी यांनी सावित्रीबाई फुले यांच्याविषयी विधान केले होते. सातत्याने अपमान करून महाराष्ट्राच्या रक्तात भिनलेले आदर्श नष्ट करायचे. मग भाजपच्या काही भाकड नेत्यांची नवे आदर्श म्हणून जनतेच्या मनात बिंबवण्याची चाल खेळली जात असल्याचेही ठाकरे म्हणाले.

#### अन्यथा महाराष्ट्र बंद : उद्धव



येत्या दोन चार दिवसात राज्यपालांचा विषय तडीस न्यावा लागेल. अन्यथा, महाराष्ट्र बंदची हाक द्यावी लागेल, असा सज्जड इशारा उद्धव ठाकरे यांनी या पत्रकार परिषदेतून दिला. महाराष्ट्र प्रेमी, फुले प्रेमी, आंबेडकर प्रेमी आणि छत्रपती प्रेमींना उभे राहावे लागेल. ज्यांना वृद्धाश्रमातही जागा नाही अशांना राज्यपाल बनविले जात आहे. कर्नाटकच्या दाव्यावर महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना काही विचारले तर ते म्हणतील की, 'काळजी करू नका. मी पंतप्रधानांना सांगितले आहे. त्यांनी ४० गावे घेतली तर घेऊ द्या. आपण पाकव्याप्त काश्मीर जिंकल्यानंतर महाराष्ट्राला १०० गावे देऊ, असे सांगायलाही मुख्यमंत्री मागेपुढे पाहणार नाहीत, असा टोलाही ठाकरेंनी मुख्यमंत्री शिंदे यांना लगावला.

### राज्यपालांनी आता सर्व मर्यादा ओलांडल्या

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

वादग्रस्त विधान करण्याचा लौकिक असलेल्या राज्यपालांनी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्याविरोधात बोलून त्यांनी आता मर्यादा ओलांडल्या आहेत, अशी संतप्त भावना राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत व्यक्त केली.

चुकीची विधाने करून समाजात गैरसमज वाढेल कसा याची खबरदारी घेणे असेच मिशन राज्यपालांचे आहे का, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. राज्यपाल पदावर बसलेल्या व्यक्तीने जबाबदारीने भूमिका घ्यायची असते, त्याचे यत्किंचितही स्मरण नसलेली व्यक्ती आज महाराष्ट्रात पाठवलेली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल चुकीचे वक्तव्य केल्यानंतर, बुधवारी काही लोकांकडून त्यांचे कौतुक करणारे स्टेटमेंट आले आहे. हे त्यांना उशिरा सुचलेले शहाणपण आहे. त्यामुळे राष्ट्रपती, पंतप्रधान यांनी त्यांचा निकाल घेतला पाहिजे. थोर व्यक्तींचा अवमान करणाऱ्या व्यक्तीकडे जबाबदारी देणे योग्य नाही, असे पवार म्हणाले.

आम्ही बरीच वर्षे बेळगाव, कारवार, निपाणीसह इतर गावे मागत आहोत. त्यामध्ये आमचे सातत्य आहे. आता कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई हे महाराष्ट्रातील काही गावे मागत आहेत. परंतु बेळगाव, कारवार, निपाणीसह ते सोडणार असतील तर त्यांना काय देता येईल यावर चर्चा होऊ शकते. मात्र, काही न करता कशाचीही मागणी करणे हे शहाणपणाचे लक्षण नाही, असा टोलाही त्यांनी बोम्मई यांना लगावला.

#### मी हात दाखवत नाही : पवार



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे ज्योतिषाकडे गेल्याच्या चर्चेवरही पवार यांनी मिश्किली केली. ते म्हणाले, मी काही ज्योतिषी नाही त्यामुळे त्याबद्दल मी काही सांगू शकणार नाही. कारण अशा गोष्टींवर माझा विश्वास नाही. त्यामुळे मी जागा सोडून हात दाखवायला कुठे जात नाही, असा टोलाही त्यांनी लगावला. गुवाहटीमध्ये काय घडले हे सगळे देशाला माहित आहे. आता पुन्हा आसामची टूर होणार असल्याचे ऐकले आहे. त्याच्याशी सुसंगत कार्यक्रम बंद करून सिन्नरला जाणे व कुणालातरी हात दाखवणे या सगळ्या गोष्टी आम्हा लोकांना नवीन आहेत. हा पुरोगामी विचारांचा महाराष्ट्र आहे. पण या राज्यात सगळ्या गोष्टी नवीन पहायला मिळत आहे. मात्र, नवीन पिढी या सगळ्या गोष्टींचा स्वीकार करणार नाही.

सकाळ पु.पा.३.

# वसई-विरारमध्ये गटारांचा धोका

## धोकादायक ठिकाणी झाकणे लावण्याची नागरिकांची मागणी

वसई, ता. २४ (बातमीदार) : वसई-विरार शहरात उघडी गटारे धोकादायक बनत आहेत. उघड्या गटारांमुळे नागरिक जखमी होण्याची भीती असल्यामुळे महापालिकेने गटारे बंदिस्त करावीत, अशी मागणी शहरवासीयांकडून होत आहे.

वसई-विरार महापालिका क्षेत्रात उघड्या गटारांत पडून एका महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. यासंदर्भात याचिका दाखल करण्यात आली होती. या सुनावणीच्या वेळी सदर घटना न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आली होती. त्यावर न्यायालयाने भूमिका स्पष्ट करत मॅनहोल मृत्यूचे सापळे नाहीत का, असा सवाल नुकताच मुंबईसह वसई-विरार शहर महापालिकेला विचारला आहे. त्यामुळे वसईतील मॅनहोलबाबत पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. नागरिकांकडून तक्रार केल्यावर उपाययोजना केल्या जात असल्या तरी अनेक भाग दुर्लक्षित राहतात. अशा धोकादायक मार्गातून विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, गरोदर माता व नोकरदार वर्गासह सर्वसामान्य नागरिक प्रवास करत असतात. त्यामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीने मॅनहोल बंदिस्त करण्याची गरज निर्माण झाली आहे.

या गटारांमुळे दुर्गंधी, डासांचा प्रादुर्भाव निर्माण होत असल्याने आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.



वसई : शहरातील उघडी गटारे धोकादायक ठरत आहेत.

वसई-विरार महापालिका क्षेत्रात ज्या गटाराला झाकणे नाहीत किंवा खुली आहेत त्याची दुरुस्ती करण्यात येते. ज्या ठिकाणी उघडी गटारे आहेत त्यांची पाहणी करून योग्य ती कार्यवाही केली जाईल.

**- राजेंद्र लाड,**
कार्यकारी अभियंता, महापालिका

सामना पा.क्रं.२.

# गुप्तधनाच्या नावाखाली एकाला गंडवले

## वसईमधून दोघा आरोपींना केली अटक

**मुंबई :** घरात सापडलेले गुप्तधन स्वस्तात विकायचे असल्याचे सांगून व्यापाऱ्यांची फसवणूक करणाऱ्या मशराम परमार आणि जगदीश साकला यांना क्राइम ब्रँच युनिट १२ ने बेड्या ठोकल्या.

तक्रारदाराचे मालाड येथे झेरॉक्सचे दुकान आहे. जुलै महिन्यात मशराम आणि जगदीश हे त्याच्या दुकानात आले. त्यांनी आपल्याकडे गुप्तधन असून ते स्वस्तात विकायचे असल्याचे सांगून एक सोन्याचा तुकडा व्यावसायिकांना दाखवला. व्यावसायिकांनी ते सोने ज्वेलर्सला दाखवले असता ते खरे निघाले. त्यानंतर त्या दोघांनी व्यावसायिकांना पैसे घेऊन मालाड पूर्व परिसरात बोलावले. मशराम आणि जगदीश यांनी खोटे सोने देऊन व्यावसायिकाकडून ४ लाख ६० हजार रुपये घेतले.

व्यावसायिकाने ते सोने ज्वेलर्सला दाखवले. तेव्हा ते सोने खोटे असल्याचे व्यावसायिकांना सांगण्यात आले.

फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर व्यावसायिकाने कुरार पोलीस ठाण्यात धाव घेतली. कुरार पोलिसांनी दोन जणांविरोधात गुन्हा दाखल केला. याचा तपास युनिट १२ करत होते. प्रभारी पोलीस निरीक्षक विलास भोसले, सहायक निरीक्षक रासकर, लिम्हणा, कल्पेश सावंत आदी पथकाने तपास सुरू केला. ते दोघे वसई परिसरात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी सापळा रचून त्या दोघांना ताब्यात घेतले. ते दोघे फसवणूक करण्यासाठी राजस्थान येथून मुंबईत यायचे.

क्राईम फाईल

सकाळ ५-५२·२०

# नार्को टेस्ट ठरू शकते अंधारातील मशाल!

## हत्येसंबंधित अनेक गुपिते उघड होण्यास मदत


श्रद्धा वालकर हत्या प्रकरण

केदार शिंत्रे : सकाळ वृत्तसेवा

मुंबई, ता. २४ : श्रद्धा वालकरच्या हत्या प्रकरणात मुख्य आरोपी आफताब अमीन पूनावालाची अखेर गुरुवारी नार्को टेस्ट करण्यात आली. आफताब नार्को टेस्टच्या माध्यमातून अनेक गुपिते उघड करू शकेल. त्यामुळे तपासात मदत होईल, अशी आशा पोलिसांना आहे. परिणामी नार्को टेस्ट तपासकर्त्यांसाठी अंधारातील मशाल ठरू शकते. तिच्या आधारे तपासावर प्रकाश पडू शकतो.

आफताबने श्रद्धाच्या हत्येचा गुन्हा कबूल केला आहे. मात्र, अद्याप पोलिसांना पुरेसे पुरावे मिळालेले नाहीत. ज्या प्रकरणांमध्ये जिथे प्रत्यक्ष पुरावा उपलब्ध नाही तिथे अशा साधनांचा उपयोग तपासाची योग्य दिशा ठरवत पुरावे गोळा करण्यासाठी होतो.

बऱ्याच वेळा अशा प्रकरणात आरोपी घडलेल्या गुन्ह्यातील सत्य तपास अधिकाऱ्यांना सांगत नाहीत. एक तर खोटी माहिती देतात अथवा मौन स्वीकारतात. अशा वेळी चाचण्यांचे अहवाल तपासकर्त्यांना योग्य दिशेने जाण्यास आणि गुन्ह्याशी संबंधित थेट पुरावे शोधण्यात मदत करतात. कायदेतज्ज्ञ तसेच फॉरेन्सिक एक्स्पर्टस्‌च्या मते पॉलिग्राफ, ब्रेन-मॅपिंग, डिसेपशन डिटेक्शन टेस्ट म्हणजेच डीडीटी आणि नार्को ॲनालिसिस यांसारख्या चाचण्यांचे निष्कर्ष पुरावा म्हणून मान्य केले जाऊ शकत नाहीत; परंतु त्यांचे अहवाल तपासकर्त्यांना योग्य दिशेने जाण्यास आणि गुन्ह्याशी संबंधित थेट पुरावे शोधण्यात मदत करतात. पुराव्यांच्या आधारे पोलिसांतर्फे न्यायालयात ठोस खटला चालविण्यास मदत होते.

### खोटे बोलण्याची शक्यता शून्य

- पॉलिग्राफ, ब्रेन-मॅपिंग, डीडीटी आणि नार्को ॲनालिसिस यांसारख्या चाचण्यांमध्ये सोडियम पेंटोथल, स्कोपोलामाइन आणि सोडियम एमायटल यांसारख्या औषधांचे डोस इंजेक्शनद्वारे दिले जातात. काही वेळाने औषधाच्या परिणामी आरोपी अर्धमूर्च्छित होतो. त्याची विचारक्षमता कमी होते.
- अशा परिस्थितीत वैज्ञानिकांच्या मते आरोपीची खोटे बोलण्याची शक्यता जवळजवळ शून्य होते.
- अशा वेळेस आरोपीला डॉक्टरांकडून तसेच तपास अधिकाऱ्यांकडून गुन्ह्याशी संबंधित विविध प्रश्न विचारले जातात. आरोपीने दिलेल्या उत्तराची नोंद केली जाते.

### कायदेशीर मूल्य

कायदेतज्ज्ञांच्या मते सत्याची पडताळणी करण्यासाठी नार्को ॲनालिसिस टेस्टशिवाय कोणताही मार्ग नाही, असा न्यायालयाचा विश्वास असेल तेव्हा तपास यंत्रणेला अशा पद्धतीने चाचण्या करण्यास न्यायालय परवानगी देऊ शकते. मात्र, त्याचे कायदेशीर मूल्य नगण्य आहे.


आफताब पूनावाला

### सत्य आणि वस्तुस्थिती

पुराव्यातून मिळालेली माहिती आणि वस्तुस्थितीची सांगड घालणे तपास यंत्रणांना आवश्यक आहे. पोलिसांनी आरोपींकडून काढलेली सर्व माहिती परस्परसंबंधित प्रस्थापित करणे आणि नंतर पुराव्यासह तपसाची दिशा निश्चित करणे अपेक्षित आहे. परिणामी तथ्यांवर आधारित खटला चालवता येऊ शकतो.

### चाचण्यांची मर्यादा

नार्को विश्लेषण आणि डीडीटी चाचण्यांनाही काही मर्यादा आहेत. न्यायालयात पुरावा म्हणून नार्को किंवा इतर चाचण्यांचे अहवाल स्वीकारले जात नाहीत. काही आरोपी संमोहन अवस्थेतही फसवणूक करण्याच्या घटना घडल्याने अशा चाचण्यांच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित होतो.

श्रद्धा वालकर हिच्या हत्येचे प्रकरण दुर्मिळातील दुर्मिळ म्हणून सहजपणे वर्गीकृत केले जाऊ शकते. म्हणून गुन्हेगाराला फाशीची शिक्षा दिली जाईल, या बाबतीत कोणतीच शंका नाही; परंतु सर्व पुरावे तपासणे आणि त्यांना क्रमवारीत जोडणे महत्त्वाचे आहे. आरोपी सत्य स्वतः सांगेल, याबाबतीत शाश्वती नाही. अशा परिस्थितीत अशा चाचण्या तपासात मार्गदर्शक ठरू शकतात.

\- **पी. के. जैन**, माजी आयपीएस अधिकारी

अशा पद्धतींचा वापर आरोपींकडून किंवा त्याच्या सहकाऱ्यांबद्दल माहिती मिळवण्यासाठी केला जाऊ शकतो. अशा चाचण्यांचा निकाल कबुलीजबाब किंवा अपराधाची कबुली म्हणून सिद्ध करता येत नाही; परंतु पुरावा शोधण्यासाठी तपास पुढे नेण्यासाठी त्याचा वापर केला जाऊ शकतो.

\- **ॲड. प्रकाश सालसिंगकर**, उच्च न्यायालय, मुंबई

म.टा. पु.पा.१.

# हिंदी भाषा भवनाचे रविवारी भूमिपूजन

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

मिरा-भाईंदरमध्ये मागील काही वर्षांपासून चर्चेत असलेल्या हिंदी भाषा भवनाचे भूमिपूजन रविवारी उत्तर प्रदेशचे आपत्ती व्यवस्थापन मंत्री स्वातंत्र्य देव सिंह यांच्या हस्ते पार पडणार आहे. मिरा-भाईंदर महापालिकेने हा कार्यक्रम जाहीर केला आहे. अभिनेता जितेंद्र हे यावेळी उपस्थित राहणार आहेत.

घोडबंदर येथील सुविधा भूखंडावर हिंदी भाषा भवन उभारण्यासाठी राज्य सरकारने एक कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. महासभा व स्थायी समितीनेही त्यासाठी आवश्यक मंजुरी दिली आहे. परंतु, या भवनाच्या निर्मितीमुळे हिंदी विरुद्ध मराठी अशी भाषक तेढ निर्माण होण्याची भीती व्यक्त करत, हे भवन रद्द करण्याची मागणी मराठी एकीकरण समितीकडून मागील अनेक वर्षांपासून केली जात आहे. या भवनाविरोधात मागच्या काही दिवसांपासून स्वाक्षरी मोहीमदेखील शहरात राबवली जात आहे.

## उत्तर प्रदेशच्या मंत्र्यांची उपस्थिती

या पार्श्वभूमीवर, मिरा-भाईंदर महापालिकेने 'कवी हरिवंशराय बच्चन हिंदी भाषा भवना'च्या भूमिपूजनाचा कार्यक्रम जाहीर केला आहे. येत्या रविवारी सकाळी ११ वाजता या भवनाचे भूमिपूजन होणार आहे. सरकारने मंजूर केलेल्या एक कोटींच्या निधीतून तळमजला अधिक एक मजला उभारला जाणार असल्याची माहिती बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांकडून देण्यात आली. तर तळ अधिक तीन मजल्याचे हे भवन टीडीआरच्या



मोबदल्यास विकासाकडून उभारले जाणार असून पहिल्या व दुसऱ्या मजल्यावर हॉल आणि तिसऱ्या मजल्यावर कार्यालय अशा सुविधा असतील, अशी माहिती सूत्रांनी दिली.

## बोधचिन्हाचा बेकायदा वापर केल्याचा आरोप

हिंदी भाषा भवनाच्या कार्यक्रमाची हिंदी भाषेतील निमंत्रणपत्रिका छापून तिचे सर्वत्र वाटप केले जात आहे. ही पत्रिका पालिकेने तयार केली नसली, तरी त्यात पालिकेचे नाव व बोधचिन्हाचा वापर करण्यात आला आहे. माजी नगरसेवक विक्रम प्रताप सिंग हे या पत्रिकेतील निमंत्रक आहेत. मात्र बोधचिन्हाचा वापर करण्यासाठी पालिकेची परवानगी घेतलेली नसल्याचा आरोप मराठी एकीकरण समितीने केला आहे. या प्रकरणी संबंधितांविरोधात फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी मागणी समितीचे गोवर्धन देशमुख यांनी पालिका आयुक्त दिलीप ढोले यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे .

## कार्यक्रम उधळून लावण्याचा इशारा

मिरा-भाईंदर शहरातील नागरिकांचा विरोध असताना असे प्रांतिक, भाषक भवन का उभारण्यात येत आहे, इतकी वर्षे शहरात शांतता असताना आता हिंदी विरुद्ध मराठी असे वातावरण पालिका का निर्माण करत आहे, असे प्रश्न मराठी एकीकरण समितीचे अध्यक्ष गोवर्धन देशमुख यांनी उपस्थित केले आहेत. या भवनाचे भूमिपूजन होऊ देणार नाही, हा कार्यक्रम उधळून लावू, असा इशारा त्यांनी दिला आहे.

लोकसत्ता पु.पा.२ →

# मनसेचा पालिकेवर मोर्चा

लोकसत्ता वार्ताहर

**भाईंदर :** मीरा-भाईंदर पालिकेच्या आरोग्य विभागातील कर्मचाऱ्याच्या मागण्या मार्गी लावण्यासाठी मनसेच्या कामगार सेनेने पालिकेवर मोर्चा आणला होता. यावेळी येत्या ३१ जानेवारीपर्यंत सफाई कामगारांच्या सर्व समस्या मार्गी लावणार असल्याचे आश्वासन पालिकेकडून त्यांना देण्यात आले.

शहराची दैनंदिन सफाई राखता यावी म्हणून पालिकेकडून कोट्यवधी रुपये खर्च करून आरोग्य ठेका देण्यात आला आहे. त्यानुसार कंत्राटदाराने शेकडो कामगारांना या कामासाठी ठेवले आहे, परंतु पालिकेने घालून दिलेल्या अत्यंत महत्त्वाच्या गोष्टींकडे हे कंत्राटदार दुर्लक्षपणा करत असल्यामुळे याचा फटका हा कामगारांना सहन करावा लागत आहे. यात वेळेवर वेतन न भेटणे, वैद्यकीय सुविधा नसणे आणि महिलांना कपडे बदल्यासाठी खोली नसणे अशा बाबींचा प्रामुख्याने समावेश आहे. या समस्याचे निवारण करण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेनेचे नेते संदीप देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली पालिकेवर धडक मोर्चा आणला होता. यावेळी आंदोलनकर्त्यांच्या मागण्या ३१ जानेवारीपर्यंत पूर्ण करण्याचे आश्वासन अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे यांनी दिले.

म.टा. पा-नं. ११५८.

# 'महाराष्ट्रप्रेमींनो, कोश्यारींविरुद्ध एकत्र या!'

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

## उद्धव ठाकरे यांचा राज्यपालांवर हल्लाबोल



'छत्रपती शिवाजी महाराजांविषयी वादग्रस्त वक्तव्य करणारे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांना हटवलं नाही, तर महाराष्ट्रप्रेमींनी एकत्र येऊन विरोध केला पाहिजे. हे असंच चालत राहिलं, तर आपल्या शूरवीर राज्याच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगली जातील. आपल्याला मग फक्त बघत बसावे लागले. त्यामुळे सर्वांनी एकत्र येऊन महाराष्ट्रद्रोह्यांना इंगा दाखवला पाहिजे. वेळ आली, तर महाराष्ट्र बंद करण्याचं देखील पाहू,' असा थेट इशाराच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी गुरुवारी दिला. 'केंद्राने महाराष्ट्रात पाठवलेले 'सॅम्पल' घरी पाठवावे, अन्यथा चांगला 'वृद्धाश्रम' असेल तिकडे पाठवा,' असा चिमटाही उद्धव ठाकरे यांनी राज्यपालांचे नाव न घेता काढला. आपल्या राज्याला मुख्यमंत्री आहेत की, नाही हेच कळत नाही, असे सांगत त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही लक्ष्य केले.

'महाराष्ट्र छत्रपती शिवाजी महाराजांना मानतो. पण, त्यांचा अपमान झाल्यावर भाजपकडून गुळगुळीत प्रतिक्रिया दिल्या जातात. केंद्रात ज्यांचं सरकार (पान ७वर)

# 'महाराष्ट्रप्रेमींनो, कोश्यारींविरुद्ध एकत्र या!'

(पान एकवरून)

आहे, त्यांच्या विचारांची माणसं राज्यपाल म्हणून नेमली जातात. या माणसांची कुवत काय असते? यांची पात्रता काय असते? ज्यांना वृद्धाश्रमातही जागा मिळत नाही. त्यांना राज्यपाल म्हणून नेमलं जातं का? आपल्या राज्यपालांना राज्यपाल म्हणणे मी सोडून दिलं आहे. यांना घालविण्यासाठी आंदोलन केल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही,' असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी वेळ पडल्यास महाराष्ट्र बंदचीही हाक देऊ, असा इशारा मातोश्री निवासस्थानी आयोजित पत्रकार परिषदेत दिला. 'ॲमेझॉनने आलेले हे पार्सल ॲमेझॉनने परत गेले तर चांगले आहे. त्यांच्याजागी सक्षम व्यक्ती यायला हवी,' अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांनी राज्यपालांना लक्ष्य केले.

'राज्याबाहेर उद्योग पळवण्याबाबत असो की, महाराष्ट्राची अस्मिता दुखावण्याबाबत असो, महाराष्ट्राची सातत्याने अवहेलना होतेय. त्यात आता कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांमध्ये भूत संचारलंय. जणू काही महाराष्ट्रात माणसं राहतच नाही. महाराष्ट्राला अस्मिता, स्वाभिमान, हिंमत, धमक आणि शक्ती असं काहीच नाही. कुणीही यावं टपली मारून जावं आणि आम्ही शिवाजी महाराज की, जय असं बोलून नुसतंच गप्प बसावं. आतापर्यंत खूप झालं. महाराष्ट्र शिवाजी महाराजांना मानतो हे काही वेगळचं सांगायची गरज नाही. महाराजांचा अपमान झाल्यानंतर गुळमुळीत प्रतिक्रिया दिल्या जात आहेत,' अशा शब्दांत ठाकरे यांनी राज्यात सुरू असलेल्या परिस्थितीवरून नाव न घेता भाजपवर टीका केली.

एकनाथ शिंदेही लक्ष्य

उद्धव ठाकरे यांनी यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही लक्ष्य केले. ते म्हणाले की, कर्नाटकचे मुख्यंत्री महाराष्ट्रातील गावांवर दावा सांगतात. महाराष्ट्राच्या अस्मितेचा आणि दैवतांचा अपमान होत आहे. पण मुख्यमंत्र्यांना त्याची कोणतीही खंत किंवा चिंता नाही. काहीतरी गोलमाल उत्तर देऊन ते वेळ मारून नेतात. या राज्याला मुख्यमंत्री आहे का, तेच कळत नाही. ते कधीही बोलतच नाहीत. महाराष्ट्रातील ४० गावे कर्नाटकमध्ये जात असतील, तर मुख्यमंत्री नेहमीच्या शैलीत उत्तर देतील. ते म्हणतील, 'काळजी करू नका. मी पंतप्रधानांना फोन केला होता. त्यांनी सांगितलं आहे की, कर्नाटकने महाराष्ट्रातील ४० गावं घेतली तर घेऊ दे. आपण पाकव्याप्त काश्मीर जिंकल्यावर १०० गावं महाराष्ट्राला देऊ.' त्यांच्याकडून कोणतीही अपेक्षाच नाही. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेदेखील सारवासारव करत आहेत, असेही ते म्हणाले.

**'हा भाजपचा राष्ट्रीय कार्यक्रम'**

'भाजपच्या अखत्यारितील राज्याचे मुख्यमंत्री त्यांच्या वरिष्ठांच्या मर्जीशिवाय काही बोलू शकतात का? कर्नाटकचे मुख्यमंत्री बोम्मई हे त्यांच्या वरिष्ठांच्या परवानगीशिवाय बोलले आहेत का? महाराष्ट्राच्या अस्मितेवर हल्ला करण्याचा हा भाजपचा राष्ट्रीय कार्यक्रम आहे का? तसे असेल तर सर्वांनी याला विरोध केला पाहिजे,' असे उद्धव ठाकरे यांनी सांगितले.